दि.१७/०१/२०२१

प्रति,

मा. प्राचार्य साहेब,

तुळजाराम चतूरचंद कला, विज्ञान

व वाणिज्य महाविद्यालय, बारामती - ४१३१०२

विषय:- राष्ट्रीय मतदार दिन साजरा करण्याची परवानगी मिळण्याबाबत.

महोदय,

२५ जानेवारी हा दिवस भारतात दरवर्षी "राष्ट्रीय मतदार दिन" म्हणून साजरा केला जातो. भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवा निमित्त "आझादी का अमृत महोत्सव" या उपक्रमा अंतर्गत आपल्या महाविद्यालयातील राज्यशास्त्र विभागाव्दारें २५ जानेवारी हा दिवस "राष्ट्रीय मतदार दिन" म्हणून साजरा करावयाचा आहे. महाविद्यालयीन विद्यार्थांमध्ये मतदानाच्या हक्का विषयी प्रचार, प्रसार व जाणीव जागृती निर्माण व्हावी, या उद्देशाने ऑनलाईन व्याख्यानाचे आयोजन करावयाचे आहे. तरी व्याख्यान घेण्यास परवानगी मिळावी.

Allowed

18.1.

आपला विश्वासू

डॉ. हनुमंत फाटक

राज्यशास्त्र विभागप्रमुख

HOD

Department of Political Science

Tuljaram Chaturchand College

Baramati 413102

TULJARAM CHATURCHAND COLLEGE BARAMATI

प्रति,

मा. प्राचार्य,

तुळजाराम चतुरचंद कला, विज्ञान

व वाणिज्य महाविद्यालय, बारामती - ४१३१०२

## विषय:- राष्ट्रीय मतदार दिन अहवाल.

महोदय,

उपरोक्त विषयान्वये, आपणांस अहवाल सादर करण्यात येतो की, मंगळवार दि. २५ जानेवारी. २०२२ रोजी राष्ट्रीय मतदार दिनाच्या निमित्ताने भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवा निमित्त "आझादी का अमृत महोत्सव" या उपक्रमा अंतर्गत तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयातील राज्यशास्त्र विभागाच्या वतीने "सर्वसमावेशक, सुलभ आणि सहभागपुर्ण निवडणुका" या विषयावर ऑनलाईन व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून मा. श्री. दादासाहेब कांबळे (प्रांताधिकारी बारामती.) सर यांनी मार्गदर्शन केले. तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरूमकर सर उपस्थित होते. या व्याख्यानाचा प्रारंभ दुपारी १२:०० वा. ऑनलाईन पध्दतीने करण्यात आला.

आपल्या देशाचा राज्य कारभार हा संविधानाच्या माध्यमातून चालतो. भारत हा सर्वात मोठी लोकशाही असलेला देश आहे. लोकशाहीमध्ये मतदारांना मतदानाच्या माध्यमातून आपले लोकप्रतिनिधी आणि सरकार निवडण्याचा अधिकार प्राप्त होतो. लोकांच्या इच्छा, आकांशा, अपेक्षांची परिपूर्ती करणारे लोकप्रतिनिधी निवडण्यासाठी मतदारांमध्ये मतदाना विषयी जाणीव जागृती करणे, हे सदृढ लोकशाहीसाठी आवश्यक आहे. असे मत यावेळी श्री. दादासाहेब कांबळे यांनी व्यक्त केले.

भारत हा जात, धर्म, पंथ, भाषा, संस्कृतीच्या विविधतेने नटलेला देश आहे. विविध सण उत्सवाच्या वेळी निवडणूक आयोगाच्या माध्यमातून मतदारांमध्ये मतदान विषयी जाणीव जागृती करण्यासाठी विविध उपक्रम राबवले जातात. भारतीय लोकशाही सुदृढ करण्यासाठी नवमतदार असलेल्या विद्यार्थ्यांनी मतदान यादी मध्ये आपली नाव नोंदणी केली पाहिजे. असे आवाहन श्री. दादासाहेब कांबळे यांनी यावेळी विद्यार्थ्यांना केले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरूमकर सर म्हणाले की, भारतीय लोकशाहीची वीण अतिशय सुदृढ आहे. भारतीय मतदार जागृत आहे. आज जगाचे नेतृत्व तरुणांच्या हाता मध्ये आहे. जगात सर्वात जास्त तरुणाई भारता मध्ये आहे. त्यामुळे भारतीय लोकशाही अधिक सुदृढ करण्यासाठी प्रत्येक विद्यार्थ्याने मतदान केले पाहिजे. विविधतेत एकात्मता असलेली भारताची समृद्ध अशी परंपरा आहे. आपल्याला मानवजातीच्या कल्याणाचे काम करायचे आहे असे गौरवोद्गार प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरुमकर सर यांनी काढले.

भारतीय राज्यव्यवस्था ही तीन स्तंभावर उभी आहे. हे तिन्ही स्तंभ अतिशय चांगल्या पद्धतीने काम करत आहे. आपण भारतीय स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव साजरा करत आहोत.

Attested original IQAC ... MBS

TULJARAM CHATURCHAND COLLEGE BARAMATI


जगातील पहिल्या दहा देशांमध्ये भारताच्या राज्यव्यवस्थेचे नंबर लागतो. याचे सर्व श्रेय भारताच्या संविधानकर्ते, राज्यकर्त्यां बरोबर भारतीय मतदारांना दिले पाहिजे. भारतीय लोकशाही ही परिपक्वतेकडे मार्गक्रमण करत आहे. त्यामुळे प्रत्येक विद्यार्थ्याने सक्रिय सहभाग घेऊन मतदान यादी मध्ये नाव नोंदवली पाहिजे. प्रत्येक नागरिकाने आपली भूमिका व जबाबदारी पार पाडली पाहिजे. असे मत यावेळी प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरुमकर सर यांनी मांडले.

यावेळी ऑनलाइन व्याख्यानाचे संयोजक आणि राज्यशास्त्र विभागाचे विभाग प्रमुख डॉ. हनुमंत फाटक सर, महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. अविनाश जगताप सर, उपप्राचार्य डॉ. अजित तेलवे सर, उपप्रचार्य डॉ. जगदिश देशपांडे सर, उपप्रचार्य डॉ. रामचंद्र सपकळ सर, उपप्रचार्य डॉ. सीमा नाईक गोसावी मॅडम, उपप्रचार्य डॉ. योगिनी मुळे मॅडम, महाविद्यालयाचे रजिस्टार श्री. अभिनंदन शहा उपस्थित होते. या व्याख्यानाला मोठ्या प्रमाणात विध्यार्थी आणि प्राध्यापक उपस्थित होते.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक व पाहुण्यांचा परिचय कार्यक्रमाचे संयोजक आणि राज्यशास्त्र विभागाचे विभागप्रमुख डॉ. हनुमंत फाटक यांनी करून दिला. तर सूत्र संचालन व आभार प्रा. राजू पांडे यांनी मांडले.

हा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी मा. प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरुमकर सर, उपप्राचार्य डॉ. अविनाश जगताप सर, डॉ. अजित तेलवे सर, उपप्रचार्य डॉ. जगदिश देशपांडे सर, उपप्रचार्य डॉ. रामचंद्र सपकळ सर, उपप्रचार्य डॉ. सीमा नाईक गोसावी मॅडम, उपप्रचार्य डॉ. योगिनी मुळे मॅडम, महाविद्यालयाचे रजिस्टार श्री. अभिनंदन शहा सर यांनी मार्गदर्शन आणि सहकार्य केले

ऑनलाइन राष्ट्रीय मतदार दिन साजरा झाला. त्याची छायाचित्रे.



TULJARAM CHATURCHAND COLLEGE BARAMATI

डॉ हनुमंत फाटक
राज्यशास्त्र विभागप्रमुख

HOD
Department of Political Science
Tuljaram Chaturchand College
Baramati 413102

अनेकांत एज्युकेशन सोसायटीचे,

# तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय, बारामती

(स्वायत्त महाविद्यालय)

No - 307

दि.२४/०१/२०२१

24 JAN 2021

## राज्यशास्त्र विभाग

***"राष्ट्रीय मतदार दिन"***

# नोटीस

महाविद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कमर्चारी यांना कळविण्यात येते की, दरवर्षी २५ जानेवारी हा दिवस भारतात **"राष्ट्रीय मतदार दिन"** म्हणून साजरा केला जातो. भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवा निमित्त **"स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव"** या उपक्रमा अंतर्गत आपल्या महाविद्यालयातील राज्यशास्त्र **विभागाव्दारें मंगळवार दि. २५ जानेवारी, २०२१ रोजी "राष्ट्रीय मतदार दिन" ऑनलाईन पध्दतीने साजरा करण्यात येणार आहे.** राष्ट्रीय मतदार दिनाच्या निमित्त **बारामतीचे प्रांताधिकारी मा. श्री. दादासाहेब कांबळे साहेब व तहसीलदार मा. श्री. विजय पाटील साहेब** यांचे विशेष मार्गदर्शन पर व्याख्यान आयोजित केले आहे.

**"सर्वसमावेशक, सुलभ आणि सहभागपुर्ण निवडणुका"** या विषयावर मंगळवार दि. २५ जानेवारी, २०२१ रोजी दुपारी १२:०० वा. Google Meet द्वारे व्याख्यान होणार आहे. आपण आपल्या विद्यार्थ्यां पर्यत ही लिंक पाठवावी. Google Meet ची लिंक व्याख्यान चालु होण्याच्या आगोदर १० मिनिट जॉईन करावी.

तरी आपण सर्वांनी "राष्ट्रीय मतदार दिन" साजरा करावयाच्या उपक्रमात सहभागी होऊन व्याख्यानाचा लाभ घ्यावा, ही विनंती.

राज्यशास्त्र विभागप्रमुख

HOD
Department of Political Science
Tuljaram Chaturchand College
Baramati 413102

Tuljaram Chaturchand College Baramati

प्राचार्य

अनेकांत एज्युकेशन सोसायटीचे,

# तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय,

बारामती

(स्वायत्त महाविद्यालय)

---

# राज्यशास्त्र विभाग

## "राष्ट्रीय मतदार दिन"

## कार्यक्रम पत्रिका

प्रास्ताविक आणि परिचय

**डॉ. हनुमंत फाटक**

राज्यशास्त्र विभागप्रमुख

## मार्गदर्शक

**मा. श्री दादासाहेब कांबळे साहेब, (प्रांताधिकारी, बारामती.)**

**मा. श्री विजय पाटील साहेब, (तहसीलदार, बारामती.)**

व्याख्यानाचा विषय: - "भारतीय लोकशाहीतील मतदारांची भूमिका"

## अध्यक्ष

**मा. डॉ. चंद्रशेखर मुरूमकर**

प्राचार्य

तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय, बारामती

**सूत्र संचालन**

डॉ. कैलाश मांटे

**आभार**

प्रा. राजू पांडे

TULJARAM CHATURCHAND COLLEGE BARAMATI

सोमवार दि.२५ जानेवारी, २०२१

वेळ: दु. २: ०० वा.

You Tube Link: https://youtu.be/A3UI-4OqBdY